गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
YASH SIDDHI NEWS

RNI NO. MAHMAR/2023/84162

● वर्ष १ ले ● अंक ३४२ वा ● शुक्रवार ०३ मे २०२४ ● पाने ४ ● किंमत ४ रु/–

| * Volume 1 | Issue 342 | Date : 03/05/2024 blow Friday Page 4 Price 4

# जम्मू काश्मीरमधील ३७० हटवून तिथे संविधान लागू केलं हीच माझी संविधानाची सर्वात मोठी सेवा : पंतप्रधान मोदी

**नवी दिल्ली/ यश सिध्दि न्यूज**

भारतीय जनता पार्टी सलग १० वर्षे देशात सत्तेवर आहे. या १० वर्षांच्या काळात भाजपा सरकारने अनेक मोठे आणि धक्कादायक निर्णयही घेतले. नोटबंदी करणे, जीएसटी लागू करणे, जम्मू काश्मीर राज्याला विशेष दर्जा देणारं कलम ३७० हटवणे ही त्यापैकी प्रमुख उदाहरणं. भाजपाने या १० वर्षांत संविधानातही संशोधन केलं. दरम्यान, भाजपाने यंदाच्या लोकसभा निवडणुकीत 'अब की बार ४०० पार'चा नारा दिला आहे. सत्तास्थापन करण्यासाठी केवळ २७२ जागा (बहुमत) जिंकणं आवश्यक असलं तरी भाजपने देशभरात ४०० जागा जिंकण्याचा निर्धार केला आहे. त्यामुळे विरोधक भाजपाच्या या निर्धाराबाबत संशय व्यक्त करत आहे.



भाजपाला देशाचं संविधान बदलायचं आहे, यंदाची लोकसभा निवडणूक ही शेवटची निवडणूक असेल, या निवडणुकीत भाजपाला ४०० जागा मिळाल्या तर देशात हुकूमशाही सुरू होईल, असे वेगवेगळे आरोप विरोधक करत आहेत. या आरोपांना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी उत्तर दिलं आहे. पंतप्रधानांनी टीव्ही ९ नेटवर्कला दिलेल्या मुलाखतीत विरोधकांच्या आरोपांवर प्रतिक्रिया दिली.

नरेंद्र मोदी म्हणाले, मी तर संविधानाची पूजा करतो आणि मी संविधानाची सर्वात मोठी सेवा देखील केली आहे. जम्मू काश्मीरमधील कलम ३७० हटवून तिथे भारताचं संविधान लागू केलं हीच माझी संविधानाची सर्वात मोठी सेवा आहे. काँग्रेस हे कधीच करू शकली नाही. आपल्या देशात संविधान लागू होऊन ६० वर्षे झाली तेव्हा मी गुजरातचा मुख्यमंत्री होतो. तेव्हा मी एका मोठ्या हत्तीवर संविधानाची प्रत ठेवली, त्या प्रतीची पूजा केली आणि एक मोठी पदयात्रा काढली. मी किंवा कुठलाही नेता त्या हत्तीवर बसला नाही. आम्ही सगळेजण त्या हत्तीबरोबर पायी चालत होतो. राज्याचा मुख्यमंत्री देखील पायी चालत होता. हे सगळं मी का केलं? तर नागरिकांच्या मनात । पान २ वर



## महाराष्ट्र राज्य स्थापना दिनानिमित्त जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या हस्ते ध्वजारोहण

**सोलापूर/प्रतिनिधी:**

महाराष्ट्र राज्य स्थापनेच्या ६५ व्या दिनानिमित्त नवीन जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रांगणात जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या हस्ते सकाळी ७ वाजून १० मिनिटांनी ध्वजारोहण करण्यात आले.यावेळी अप्पर जिल्हाधिकारी मोनिका सिंह ठाकुर, निवासी उपजिल्हाधिकारी मनीषा कुंभार, उपजिल्हा निवडणूक अधिकारी गणेश निऱ्हाळी, उपजिल्हाधिकारी महसूल अमृत नाटेकर, उपजिल्हाधिकारी विठ्ठल उदमले, उपजिल्हाधिकारी संतोष देशमुख,जिल्हा नियोजन अधिकारी दिलीप पवार यांच्यासह महसूल विभागाचे सर्व अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

*आदर्श तलाठी पुरस्कार वितरण : महाराष्ट्र शासनाकडून सन १९९६-९७ या वर्षापासून महाराष्ट्र दिनाच्या दिवशी प्रत्येक जिल्ह्यातील एका तलाठ्याला आदर्श तलाठी पुरस्कार देऊन गौरविण्यात येते. सन २०२३-२४ वर्षासाठी सोलापूर जिल्ह्यातून श्रीमती पल्लवी पंडित बागुल, तलाठी, अप्पर तहसील कार्यालय मंद्रुप,उपविभागीय कार्यालय सोलापूर क्रमांक दोन यांना हा पुरस्कार जाहीर झालेला आहे. प्रमाणपत्र व । पान २ वर

## संजय निरुपम शिवसेना शिंदे गटात प्रवेश करणार

**मुंबई/यश सिध्दि न्यूज :**

काही दिवसांपूर्वी काँग्रेसला सोडचिठ्ठी दिलेले संजय निरुपम यांनी आज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची मुंबईतील बाळासाहेब भवन येथे भेट घेतली. या भेटीदरम्यान मुख्यमंत्री शिंदे आणि संजय निरुपम यांच्यामध्ये काहीवेळ चर्चा झाली. या चर्चेनंतर संजय निरुपम हे शिवसेना शिंदे गटात लवकरच प्रवेश करणार असल्याची माहिती देण्यात आली आहे. यासंदर्भात संजय निरुपम यांनीही माध्यमांशी बोलताना आपण शिवसेनेत प्रवेश करणार असल्याचे सांगितले आहे.



मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज भेटीसाठी बोलावले होते. या भेटीदरम्यान पुढे काय करायचे? यावर सविस्तर चर्चा झाली. परवा (शुक्रवारी ३ मे रोजी) दुपारी शिवसेना शिंदे गटात प्रवेश करण्याचे नियोजन आम्ही केले आहे. या प्रवेशासंदर्भातील बाकी सविस्तर माहिती ही पक्षाकडून देण्यात येईल. तसेच पक्षात प्रवेश केल्यानंतर पक्षाचे जेवढेही लोकसभेचे उमेदवार आहेत, त्यांच्यासाठी आपण प्रचार करणार असून शिवसेनेचे सर्व उमेदवार निवडून आणण्यासाठी पूर्ण प्रयत्न करणार आहे, अशी । पान २ वर

## देशातील नक्षलवाद, आतंकवाद, गरिबी, भ्रष्टाचार, असुरक्षितता यांचे मूळ काँग्रेस आहे : योगी आदित्यनाथ

### राम सातपुते यांच्या प्रचारार्थ आयोजित सभेला प्रचंड प्रतिसाद

### आजवरची सर्वाधिक विकासकामे भाजपच्या काळात

स्वातंत्र्यानंतर सर्वाधिक मोठी विकासकामे भाजपच्या काळात झाली आहेत, असे उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ म्हणाले. २५ कोटी नागरिक गरिबी रेषेच्या बाहेर आले, ८० कोटी जणांना मोफत अन्नधान्य मिळाले, आठ कोटी लोकांना आयुष्मान भारत सुविधा मिळाली, ५० कोटी जनतेची जनधन खाती उघडण्यात आली, १२ कोटी शेतकऱ्यांना किसान सन्माननिधी मिळाला, १२ कोटी घरांमध्ये शौचालयांची निर्मिती झाली, १० कोटी घरांमध्ये उज्वला योजनेच्या माध्यमातून मोफत गॅस जोडणी मिळाली, चार कोटी जणांना प्रधानमंत्री आवास योजनेतून घर मिळाले, अडीच कोटी घरांमध्ये वीज जोडणी मिळाली अशी विकासकामांची यादीच मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी सोलापूरकरांसमोर सादर केली.



**सोलापूर/प्रतिनिधी**

देशातील नक्षलवाद, आतंकवाद, गरिबी, भ्रष्टाचार, असुरक्षितता यांचे मूळ काँग्रेस आहे. प्रभू श्रीरामांचे अस्तित्व नाकारणाऱ्या आणि हिंदूंना आतंकवादी म्हणणाऱ्या काँग्रेसला सोलापूरकरांनी पराभूत करावे, असे आवाहन उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी केले. भाजपा आणि महायुतीचे उमेदवार आमदार राम सातपुते यांच्या प्रचारार्थ बुधवारी वल्ल्याळ मैदानावर। पान २ वर

## महाराष्ट्र राज्य स्थापना दिनानिमित्त प्रांताधिकारी सचिन इथापे यांच्या हस्ते ध्वजारोहण

**पंढरपूर/प्रतिनिधी:**

महाराष्ट्र राज्य स्थापनेच्या ६४ व्या वर्धापन दिनानिमित्त तहसिल कार्यालय, पंढरपूर येथे प्रांताधिकारी सचिन इथापे यांच्या हस्ते सकाळी ८.०० वाजता ध्वजारोहण करण्यात आले. तहसिल कार्यालय येथे आयोजित करण्यात आलेल्या या ध्वजारोहण सोहळयास तहसिलदार सचिन लंगुटे, गटविकास अधिकारी सुशील संसारे, मुख्याधिकारी प्रशांत जाधव, नायब तहसिलदार मनोज श्रोत्री, पंडीत कोळी, वैभव बुचके, गटशिक्षण अधिकारी मारुती लिगाडे, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. एकनाथ बोधले उपस्थित होते. यावेळी राष्ट्रगीत व राज्य गीत गायन झाले. तसेच पोलीस पथकाच्या वतीने मानवंदना देण्यात आली. याप्रंसगी स्वांतत्र्यसैनिक, शासकीय अधिकारी, पदाधिकारी, कर्मचारी व नागरीक उपस्थित होते.



## जिल्ह्यातील ३ हजार ६१७ मतदान केंद्रावर स्वच्छता मोहीमेचा शुभारंभ

***जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी बोरामणी येथील मतदान केंद्र परिसरात स्वतः झाडू हाती घेऊन स्वच्छता मोहिमेचा शुभारंभ केला *ग्रामीण भागातील २ हजार ३६१ शहरी भागातील १ हजार २५६ मतदान केंद्रावर ही स्वच्छता मोहीम राबवली जाणार *जिल्ह्यातील सर्व मतदारांनी ७ मे रोजी सकाळी ७ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत मतदान केंद्रावर जाऊन मतदानाचा हक्क बजावण्याचे आवाहन**



**सोलापूर/प्रतिनिधी:**

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार सोलापूर जिल्ह्यातील सोलापूर व माढा लोकसभा मतदारसंघासाठी दिनांक ७ मे २०२४ रोजी सकाळी ७ ते सायंकाळी ६ या कालावधीत मतदान होणार आहे. जिल्ह्यातील जास्तीत जास्त मतदारांनी मतदान करण्यासाठी प्रशासनाच्या वतीने विशेष प्रयत्न केले जात आहे. त्याच अनुषंगाने जिल्ह्यातील ३ हजार ६१७ मतदान केंद्रावर स्वच्छता मोहीम राबवून त्या ठिकाणी आवश्यक त्या सर्व सोयीसुविधा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. ग्रामीण भागातील २ हजार ३६१ मतदान केंद्रापैकी दक्षिण सोलापूर तालुक्यातील बोरामणी येथील मतदान केंद्रावर जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी मतदान केंद्राच्या परिसरात स्वतः झाडू हाती घेऊन केंद्र परिसरात स्वच्छता मोहिमेचा शुभारंभ केला. नगरपालिका स्तरावरील ४८४ मतदान केंद्रावर ही आजपासून स्वच्छता मोहीम सुरु झाली असून महापालिका स्तरावरील ७७२ केंद्रावर स्वच्छता मोहीम लवकरच सुरू होत आहे. यावेळी जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर, दक्षिण सोलापूर तालुक्याचे गटविकास अधिकारी श्री. वाघ यांच्यासह बोरामणी येथील ग्राम स्तरीय कर्मचारी उपस्थित होते.

मागील लोकसभा निवडणुकीत सोलापूर जिल्ह्यात सरासरी मतदान जवळपास ६१ टक्के इतके झालेले आहे ते यावर्षी लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ मध्ये किमान ७० टक्के पेक्षा अधिक मतदानाची टक्केवारी वाढण्यासाठी जिल्हा प्रशासनाच्या वतीने विशेष प्रयत्न करण्यात येत आहेत. त्याच अनुषंगाने जिल्ह्यातील सर्व मतदान केंद्रावर मतदारांसाठी अनेक सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यात येत असल्याची माहिती जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिली.

यामध्ये सोलापूर जिल्ह्यातील वाढते तापमान पाहता सावलीसाठी प्रत्येक मतदान केंद्रावर मंडप उभारण्यात येणार आहे, त्यामुळे मतदारांना उन्हाचा त्रास होणार नाही. तसेच मतदान केंद्रावर पिण्याच्या पाण्याबरोबरच ओआरएस चे पाणीही उपलब्ध करून देण्यात येणार आहे. मतदान केंद्र परिसराची स्वच्छता मोहीम सुरू करण्यात आलेली असून प्रत्येक मतदान केंद्र व परिसर अत्यंत स्वच्छ ठेवण्यात येणार आहे. ही मोहीम ६ मे २०२४ पर्यंत राबविण्यात येत आहे. मतदान केंद्र व परिसरात स्वच्छता राहिल्याने मतदारांना मतदान करण्यासाठी उत्साह राहील. मतदान केंद्रावर मोठ्या रांगा लागल्यास मतदारांना बसता यावे यासाठी तेथे बेंचेस व खुर्चीची व्यवस्था करण्यात येणार आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी दिली.

प्रत्येक मतदान केंद्रावर जेष्ठ मतदारांच्या व दिव्यांग मतदारांच्या मदतीसाठी व्हील चेअर ची सुविधा देण्यात आली असून त्यांच्या मदतीसाठी स्वयंसेवक ही नियुक्त करण्यात आले आहे. त्याप्रमाणे मतदान केंद्रावर रॅम्पचीही व्यवस्था करण्यात आलेली आहे. मतदारांसाठी मतदान केंद्राच्या ठिकाणी मतदार मदत कक्ष उघडण्यात येणार आहे, त्या ठिकाणी बी. एल.ओ. ची नियुक्ती केलेली आहे. मतदारांच्या आरोग्यासाठी प्रत्येक मतदार केंद्रावर स्वच्छतागृह स्वच्छ करण्यात आलेले आहेत. मतदारांना हिरकणी कक्षाची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. ज्या ठिकाणी पाच व पाच पेक्षा जास्त मतदान केंद्र आहेत अशा ठिकाणी प्रत्येक मतदान केंद्राला कलर कोडींग चा वापर केलेला असून मतदारांना त्यांचे मतदान केंद्र शोधणे अत्यंत सुलभ करण्यात आलेले आहे, असे जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी सांगून जिल्ह्यातील जास्तीत जास्त मतदारांनी दिनांक ७ मे २०२४ रोजी आपले नाव असलेल्या मतदान केंद्रावर जाऊन सकाळी ७ ते सायंकाळी ६ या कालावधीत सशक्त लोकशाहीसाठी आपला मतदानाचा हक्क बजावण्याचे आवाहन केले.

# स्वेरीज् कॉलेज ऑफ फार्मसीमध्ये 'माजी विद्यार्थी मेळावा'

**पंढरपूर/प्रतिनिधी**

गोपाळपूर (ता.पंढरपूर) येथील श्री. विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिट्यूट संचलित कॉलेज ऑफ फार्मसीमध्ये 'माजी विद्यार्थी मेळावा' नुकताच संपन्न झाला. माजी विद्यार्थी मेळावा हे विद्यार्थ्यांना पुन्हा जोडण्यासाठी, त्यांचे अनुभव शेअर करण्यासाठी आणि संस्थेच्या प्रगतीत योगदान देण्यासाठी उभारलेले एक व्यासपीठ असते. अशा माजी विद्यार्थ्यांचा व त्यांच्या व्यक्तिमत्वात दडलेल्या कुशल पदवीधरांचा संस्थेला नेहमीच सार्थ अभिमान असतो. या मेळाव्यामुळे माजी विद्यार्थ्यांमध्ये असलेली उर्जा द्विगुणीत होत असते. एकूणच स्वेरीमध्ये आठवणीत रंगलेल्या माजी विद्यार्थ्यांच्या स्नेह मेळाव्यात पद-प्रतिष्ठा सर्व विसरून विद्यार्थी दशेत एकत्र येवून आनंदोत्सव साजरा करत असल्याचे चित्र या मेळाव्यात स्पष्ट दिसत होते.

या कार्यक्रमासाठी डिप्लोमा फार्मसी, बी. फार्मसी व एम. फार्मसी या तिन्ही शाखांतील विद्यार्थी उपस्थित होते. या मेळाव्याच्या निमित्ताने फार्मसी महाविद्यालयातील माजी विद्यार्थी शिक्षण संपल्यानंतर स्वेरीमध्ये पुन्हा एकदा एकत्र आले होते. कॅम्पसमध्ये, वर्गात फेरफटका मारताना ते जुन्या




आठवणी ताज्या करत होते. 'प्रत्येकजण आपले कॉलेज कसे होते आणि कसे आहे, हे डोळ्यांमध्ये साठवून घेत होता. जुना वर्ग मित्र भेटल्याचा आनंद देखील एकमेकांच्या चेहऱ्यावर जाणवत होता. संस्थेचे संस्थापक सचिव डॉ. बी.पी. रोंगे यांच्या नेतृत्वाखाली सन २००६ मध्ये स्वेरीज् कॉलेज ऑफ फार्मसीची स्थापना झाली. तेंव्हापासून कॉलेजच्या यशाचा आलेख उंचावत चालला आहे. कॉलेज पूर्ण केल्यानंतर उत्तीर्ण झालेले विद्यार्थी हे विविध फार्मस्युटिकल कंपन्या, शिक्षण, नागरी सेवा, व्यवसाय आदी क्षेत्रात वेगवेगळ्या विभागांमध्ये आपले योगदान देत आहेत. विविध क्षेत्रांमध्ये काम करत असलेल्या या माजी विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमासाठी सहभाग नोंदवला. माजी विद्यार्थ्यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने मेळाव्याला सुरवात झाली. यावेळी प्राचार्य डॉ. एम.जी. मणियार म्हणाले की, 'स्वेरी मध्ये शिक्षण घेवून आपण बाहेरील विश्र्वात यशस्वीपणे करिअर करत आहात याचा संस्थेला सार्थ अभिमान वाटतो. हे करत असताना सामाजिक कार्यात देखील योगदान दिले पाहिजे. सध्या शिकत असलेल्या विद्यार्थ्यांसाठी, त्यांच्या भविष्यासाठी उपयुक्त असे उपक्रम घेऊन ह्या विद्यार्थ्यांना आपला अनुभव सांगून सहकाऱ्याची भूमिका बजावावी. यामुळे तुमच्या अनुभवाचा फायदा ह्या विद्यार्थ्यांना देखील भविष्यात होईल.' प्रा.आर.एस.नाईकनवरे यांनी फार्मसी कॉलेजच्या स्थापनेपासून ते आतापर्यंतची यशस्वी वाटचाल, मानांकने, वाढलेले इन्फ्रास्ट्रक्चर, यासाठी केले परिश्रम आणि याला मिळालेली मधुर व चवदार फळे याबाबत विस्तृत माहिती दिली. याप्रसंगी 'आकार मेडिकल टेक्नॉलॉजी' कंपनी मध्ये उत्पादन व्यवस्थापक असलेले स्वेरीचे माजी विद्यार्थी रोहित कांबळे म्हणाले की, 'मी सध्या ज्या क्षेत्रात काम करत आहे इथे आवश्यक असणाऱ्या बऱ्याच गोष्टी मला माझ्या पदवीच्या शिक्षणादरम्यान शिकायला मिळाल्या. याचाच फायदा मला होत आहे. स्वेरी फार्मसीतून मिळालेल्या शिस्तीमुळेच मी इथपर्यंत पोहचू शकलो.' असे सांगून विद्यार्थी दशेत असताना आलेला अनुभव सांगितला. दक्षिण आफ्रिकेतील ए.सी.जी. या मल्टिनॅशनल कंपनी मध्ये सेल्स इनचार्ज या पदावर कार्यरत असलेले माजी विद्यार्थी सागर चांडोले म्हणाले की,' स्वेरीमध्ये राबवल्या जाणाऱ्या 'ट्रिपल पी इ' सिस्टिम मुळे माझ्या व्यक्तिमत्वामध्ये खूप मोठा बदल झाला. या बदलामुळे व स्वेरीतील शिस्तीमुळे यश संपादन करू शकलो.' माजी विद्यार्थी अक्षय पाटील, रणजित शिंदे, दीपाली यादव, अनुराधा पाटील, मंदाकिनी होळकर आदींनी देखील आपल्या मनोगतातून स्वेरीच्या माध्यमातून झालेला बदल आणि उज्वल करिअर याबद्धल कृतज्ञता व्यक्त केली. यावेळी माजी विद्यार्थ्यांना स्वेरीतर्फे स्मृतीचिन्हे देवून सन्मानित करण्यात आले. यावेळी डिप्लोमा फार्मसीचे विभागप्रमुख डॉ. जे.बी.कंदले, समन्वयक डॉ. डी.जे. यादव, डॉ. व्ही.व्ही. मोरे तसेच सर्व प्राध्यापक उपस्थित होते. प्रा. ए.आर.चिक्काळे यांनी सूत्रसंचालन केले तर डॉ. जे.बी. कंदले यांनी आभार मानले.

# भारतातील पहिल्या महिला शिल्पकार. सुप्रिया शेखर शिंदे यांच्या शिल्पाची वर्ड रेकॉर्ड ऑफ इंडिया मध्ये झाली नोंद

**निफाड/यश सिध्दि न्यूज**

वर्ड रेकॉर्ड ऑफ इंडियाच्या वतीने भारतातील अद्भुत आणी अद्वितीय कार्य करणाऱ्या व्यक्तीच्या कार्याची दखल घेऊन त्यांनी केलेल्या कार्याची नोंद घेतल जाते! कामकाज करतात. सुप्रिया शिंदे यांनी भारती विद्यापीठ मधून पाच वर्षाचा डिप्लोमा इन जी डी आर्ट केला आहे. सुप्रिया शिंदे यांनी युऐई अबुधाबी येथे जागतिक शिल्पकला प्रदर्शनामध्ये भाग घेऊन जगभरात महिला शिल्पकार म्हणून आपला ठसा उमटवला होता. संपूर्ण भारतभरात वेगवेगळ्या ठिकाणी सौ सुप्रिया शेखर शिंदे यांना प्रथम महिला शिल्पकार म्हणून गौरवण्यात आलेले आहे.गोवा कला पुरस्कार, अखिल भारतीय कला पुरस्कार,महाराष्ट्र राज्य कला प्रदर्शन पुरस्कार तसेच दादा कोंडके कला यात्री पुरस्कार बरोबरच तीस पुरस्कार त्यांना आता पर्यंत मिळालेले आहेत.मूळचे आंदगाव मुळशीचे रहिवासी असणाऱ्या सुप्रिया शेखर शिंदे यांचे माहेर आंबेगाव तालुक्यातील असून त्यांना शिल्प कलेचा वारसा जन्मा पासून त्यांच्या वडिलांकडून लाभला असून आता पर्यंत राजमाता जिजाऊ, छत्रपती शिवराय, महात्मा ज्योतिबा फुले, भगत सिंग, सुखदेव, राजगुरू, स्वामी समर्थ, इत्यादी अनेक तसेच शरद पवार, किसनराव बाणखिले असे अनेक राजकीय पुढारी यांचे पुतळे त्यांनी घडविले. आणी आता आणखीन एक मानाचा तुरा त्यांच्या शिरपेचात डौलाने मिरवणार आहे आणि तो म्हणजे वर्ल्ड रेकॉर्ड ऑफ इंडिया यांनी त्यांच्या कार्याची दखल घेऊन त्यांच्या शिल्प कार्याची नोंद करून घेतली... सुप्रिया शिंदे यांनी साकारलेल्या स्वामीच्या मूर्तीची चर्चा संपूर्ण तळेगाव परिसरात जाणवली.....



असे प्रतिपादन वर्ड रेकॉर्ड ऑफ इंडियाचे सीईओ पवन सोळंकी यांनी पहिल्या महिला शिल्पकार.सुप्रिया शेखर शिंदे यांचा सन्मान करताना काढले. तसेच सोळंकी यांनी सुप्रिया शिंदे यांच्या जागतिक दर्जाच्या शिल्प कार्याची नोंद वर्ल्ड रेकॉर्ड मध्ये केली गेली असे जाहीर केले.

श्री स्वामी समर्थ यांची ११३१ किलोची प्युअर तांब्याची मूर्तीची एक संघ कास्टिंग यापूर्वी कोणीच केले नाही. त्या कामगिरी बद्दल हा बहुमान सुप्रिया शेखर शिंदे यांना वर्ल्ड रेकॉर्ड ऑफ इंडियाचे सीईओ पवन सोळंकी यांचे हस्ते तळेगाव पुणे येथे मानपत्र देऊन सन्मानित करण्यात आले..

या सन्मानाला उत्तर देताना सुप्रिया शिंदे यांनी त्यांचे पती शेखर शिंदे यांच्या साथीमुळेच हे शक्य झाल्याची भावना व्यक्त केली.भारतातील पहिल्या महिला शिल्पकार सौ सुप्रियाताई शेखर शिंदे, ह्या शिल्पसिद्धी स्टुडिओ आंबेगाव- खुर्द पुणे येथून शिल्पकलेचे

# आम्मा पाणपोई मधील पाणी पेऊन नागरीक समाधानी

**नळदुर्ग/दादासाहेब बनसोडे**

नळदुर्ग आणि परिसरातील ६० ते ७० खेडेगावातील नागरिक नळदुर्गच्या ऐतिहासिक शहरात दळणवळणासाठी येत आसतात ऐन उन्हाळ्यात उष्णता वाढल्याने पारा ही शिगेला पोहोचला आहे

या सर्व गोष्टीचा लेखाजोखा घेता आम्मा पाणपोई चे दाते नळदुर्ग नगरीचे माजी नगरसेवक विनायक अंहकारी यांनी तहानलेल्या नागरिकांना जारमधील थंडगार पिण्यासाठी पाणी ठेवल्यामुळे हजारो नागरिकांनी या पाणपोईचा लाभ घेतला आम्मा पाणपोई मधील पाणी पेऊन नागरीकानी समाधान ही व्यक्त केले .

आम्मा पाणपोई मुळे नळदुर्ग मध्ये हजारो लोकांची तहान भागवली नळदुर्ग येथील माजी नगरसेवक व ब्राह्मण समाजाचे अध्यक्ष विनायक अहंकारी यांनी आपल्या मातोश्री यमुनाबाई ( आम्मा ) रंगराव अहंकारी यांच्या स्मरणार्थ गेल्या दोन महिन्यापासून दररोज पाणपोई सुरु केली होती

निलम कलेक्शन समोर सुरु केलेली ही पाणपोई नळदुर्ग आणि परिसरातील लोकांना खूप फायद्याची ठरलीआजपर्यंत एकही दिवस खंड न




पडता ही पाणपोई सुरु आहे.. आज या पाणपोईला आम्माच्या तिन्ही मुलांना भेट दिली..यावेळी श्रीनिवास अहंकारी.. श्रीमती विजया बंडोपंत कुलकर्णी.. अमित देशपांडे व माजी नगरसेवक विनायक अहंकारी उपस्थित होते..या पाणपोईची देखभाल हालीम पटेल.. राजशेखर भोसगे.. पंचशील कांबळे.. गुलाब येडगे.. प्रदीप ग्रामोपाध्याय यांनी केली आहे...

# कविता जीवन मूल्यांची वाहिनी असते : प्रा.दामोदर मोरे

**नेरळ/आशा रणखांबे**

कविता ही जीवन मूल्यांची वाहिनी असते. मूल्यें समाजाची पातळी उंचावण्याचे काम करीत असतात. कवितेला करुणा या मूल्याचे अधिष्ठान असले पाहिजे. संघपाल वाठोरे




यांच्या 'अन् देव निरुत्तर झाला' या कविता संग्रहाला जशी ग्रामीण, सामाजिक पर्यावरणाची पार्श्र्वभूमी आहे तशीच माथेरान सारख्या निसर्ग रम्य ठिकाणाचीही पार्श्र्वभूमी आहे. तरल संवेदनशीलता, संवाद शैली आणि ग्रामीण बोलीचा जिवंत झरा यामुळे या कविता मनाची पकड घेतात. असे प्रतिपादन जेष्ठ मराठी हिंदी साहित्यिक प्रा.दामोदर मोरे यांनी केले. संघपाल वाठोरे यांच्या 'अन् देव निरुत्तर झाला' या कविता संग्रहाच्या प्रकाशन समारंभात अध्यक्षीय भाषण करतांना ते हुतात्मा हिराजी पाटील सामाजिक सभागृह बोपेले नेरळ येथे बोलत होते . पीपल्स पब्लिकेशनकडून प्रकाशित करण्यात आलेल्या 'अन् देव निरुत्तर झाला' या कवितासंग्रहाचे प्रकाशन जोशी बेडेकर महाविद्यालयाचे माजी मराठी विभागप्रमुख, मराठी व हिंदी ज्येष्ठ साहित्यिक प्रा. दामोदर मोरे यांच्या अध्यक्षतेखाली व ज्येष्ठ कवी अरुण म्हात्रे यांचे हस्ते करण्यात आले. जेष्ठ साहित्यिक अरुण म्हात्रे यांनी यावेळी लिंबू महात्म्य ही कवी संघपाल वाठोरे यांची कविता आपल्या सुरेल आवाजात सादर केली. तर संघपाल वाठोरे, स्वाती वाठोरे , सचिन भोईर यांनी ही 'अन् देव निरुत्तर झाला' या संग्रहातील कवितांचे वाचन केले. प्रमुख मान्यवर पाहुण्यांचे स्वागत संविधान उद्देशिका आणि पुष्पगुच्छ देऊन करण्यात आले यावेळी सावळाराम जाधव, लेखक गिरीश कंटे, कवी संघपाल वाठोरे , प्रकाशक प्रा. हरेंद्र सोष्टे , कवी नवनाथ रणखांबे , कवी अनंत धनसरे आदी उपस्थित होते.

# आवळे येथे गौतम बुद्ध व डॉ.बाबासाहेब आंबेडकर मूर्ती प्रतिष्ठापना सोहळा मोठ्या उत्साहात

**भिवंडी/मिलिंद जाधव**

बुद्ध विहार म्हणजे आंबेडकरी चळवळीचे सांस्कृतिक केंद्रबिंदू मानले जाते. त्याच अनुषंगाने भारतीय बौद्ध महासभा आवळे, मिलिंद नगर व युग प्रवर्तक सामाजिक संघ आवळे यांच्या वतीने भिवंडी तालुक्यातील आवळे, बौद्ध वाडा मिलिंद नगर येथिल विहारामध्ये तथागत भगवान गौतम बुद्ध व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मूर्तीची प्रतिष्ठापना करण्यात आली.






सदर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संजय. भ. गायकवाड होते. सायंकाळी दुगाड फाटा ते मिलिंद नगर, आवळे येथे धम्म रॅली काढण्यात आली होती. यावेळी आणि ते भंते लामा,भंते संघपाल व ज्येष्ठ बौद्ध साहित्यिक डी. एल. कांबळे यांच्या उपस्थितीत कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. तर भंते लामा,भंते संघपाल यांनी उपस्थित नागरिकांना धम्मदेसना दिली. तर तथागत भगवान गौतम बुद्ध डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिप्रेत असणारी समाज व्यवस्था निर्माण करण्यासाठी आपण सर्वांनी एकत्र आले पाहिजे. असे सांगत ज्येष्ठ बौद्ध साहित्यिक डी. एल. कांबळे यांनी उपस्थित नागरिकांचे प्रबोधन केले. आयोजकांच्या वतीने उपस्थित नागरिकांना पुस्तक देऊन सन्मानित करण्यात आले. तर सागर भोईर प्रस्तुत ब्लू डायमंड ऑर्केस्ट्रा सादर करण्यात आला. त्यात सुर नवा ध्यास फेम सुप्रसिद्ध गायक प्रबुद्ध जाधव यांनी बुद्ध ,भीम गीत सादर करत कार्यक्रमात रंगत आणली. व ब्लू डायमंड ऑर्केस्ट्रा टीमने प्रेक्षकांची मने जिंकली.

सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संजय भ. गायकवाड, देविदास जाधव, भूपेंद्र जाधव,सुनिल जाधव, शुभम भालेराव, अजय जाधव यांनी मेहनत घेतली. यावेळी सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक राजकीय, क्षेत्रातील मान्यवर तर सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक अँड . सचिन भोईर यांनी मांडले तर सूत्रसंचालन अँड. शशिकांत जाधव यांनी केले. तर आभार संजय भ. गायकवाड यांनी मानले.

# भाजपमुळे लोकशाहीला दृष्ट लागली : आमदार प्रणिती शिंदे

**सोलापूर/प्रतिनिधी**

भाजपमध्ये लोकशाहीला दृष्टी लागली. आपल्या महाराष्ट्राची संस्कृती आणि परंपरा हे बिघडवायला निघाले आहेत. म्हणून हे लोक आपली संस्कृती परंपरा आपली एकी बिघडवत असतील आणि दुसरीकडे शेतकऱ्यांचा अंत करत असतील. आरक्षणासाठी हे बोलायला तयार नाहीत. ही खरी लोकशाहीची परीक्षा असल्याचे प्रतिपादन सोलापूर लोकसभा मतदारसंघाच्या महाविकास आघाडीच्या उमेदवार प्रणिती शिंदे यांनी केले आहे. हुलजंती येथे सभेत बोलत असताना प्रणिती शिंदे यांनी प्रतिपादन केले आहे. आज शनिवार दिनांक २७ एप्रिल २०२४ रोजी प्रणिती शिंदे यांनी बोराळे, मरवडे, हुलजंती सलगर बुद्रुक पंचायत समिती गण दौरा केला. यावेळी प्रणिती शिंदे बोलत होत्या. यावेळी त्यांच्यासोबत महाविकास आघाडीचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.यावेळी पुढे बोलताना प्रणिती शिंदे म्हणाल्या, मी सोलापूर जिल्ह्यात म्हणून शब्द दिला आहे पहिला आवाज लोकसभेमध्ये शेतकऱ्यांसाठी असेल. पहिला आवाज पाण्यासाठी आणि आरक्षणासाठी असेल. मी कामाची पक्के आहे. मी राजकारणात सत्तेसाठी आणि टक्केवारीसाठी आले नाही. मी तुमचा आशीर्वाद घेण्यासाठी आली आहे. ही निवडणूक जरी माझी असली तरी विजय तुमचा आहे, असे यावेळी प्रणिती शिंदे यांनी सांगितले.

मी प्रतिज्ञापत्र तयार केले असून हे प्रतिज्ञापत्र दोन दिवसात तुमच्यासमोर जाहीर करणार आहे. दरम्यान, मी सोलापूर जिल्हा दुष्काळमुक्त करणारच. सोलापूर जिल्हा लोडशेडिंगमुक्त करणार. शेतकऱ्यांना एमएसपी मिळवून देणार आणि कर्जमुक्त करणार. प्रत्येक गावात येणारा रस्ता मी करणार, सोलापुरात युवकांसाठी आयटी पार्क आणि नोकरीसाठी उद्योग आणणार, असे आश्र्वासन यावेळी आमदार प्रणिती शिंदे यांनी दिले आहे. दरम्यान मी हे काम नाही केले तर, कान धरून खाली बसवण्याचा अधिकार देखील तुम्हाला असल्याचे शिंदे यांनी सांगितले आहे.

यावेळी कार्याध्यक्ष ॲड नंदकुमार पवार, रतनचंद शहा बॅकेचे अध्यक्ष राहुल शहा, दिलीप जाधव, फिरोज मुलाणी, चंद्रशेखर कौडूभैरी,



तालुकाध्यक्ष प्रशांत साळे, प्रा.येताळा भगत, प्रथमेश पाटील, हणमंत दुधाळ, साहेबराव पवार, पांडुरंग चौगुले, पांडुरंग जावळे, दौलत माने, दादा पवार, साहेबराव पवार, पै.दामोदर घुले, मनोज माळी रविकरण कोळेकर, राजाराम जगताप, तुकाराम भोजने, अजय अदाटे पांडुरंग निराळे बापू अवघडे नाथा ऐवळे सुनीता अवघडे आदीसह काँग्रेस पदाधिकारी यावेळी उपस्थित होते.

# महाराष्ट्र नवनिर्माण सेना आयोजित महायुती प्रमुख पदाधिकारी बैठक

**पंढरपूर/प्रतिनिधी:**

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे नेते दिलीप बापू धोत्रे यांनी सोलापूर आणि माढा लोकसभा मतदारसंघातील महायुतीचे अधिकृत उमेदवार राम सातपुते आणि रणजीत सिंह नाईक निंबाळकर यांच्या प्रचारासाठी पंढरपूर शहर तालुक्यातील महायुतीच्या विविध घटक पक्षाच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांची बैठक पंढरपूर शहरातील हॉटेल विठ्ठल इन येथे आयोजित केली होती.




या बैठकीमध्ये महायुतीच्या दोन्ही उमेदवारांना प्रचंड मताने निवडून आणण्याचा निर्धार करण्यात आला.महायुतीतील सर्वच पदाधिकाऱ्यांनी कार्यकर्ते यानी दोन्ही मतदारसंघातील प्रत्येक घरोघरी जाऊन महायुतीच्या दोन्ही उमेदवारांचा प्रचार करणार आहेत.

यावेळी मनसे नेते दिलीप बापू धोत्रे यांच्यासह भारतीय जनता पार्टीचे राष्ट्रीय कार्यकारणी सदस्य प्राध्यापक चांगदेव कांबळे, शिवसेनेचे संपर्कप्रमुख महेश साठे, राष्ट्रवादीचे प्रदेश सचिव श्रीकांत शिंदे, भारतीय जनता पार्टीचे माजी जिल्हाध्यक्ष काशिनाथ थिटे, बाबासाहेब बडवे, शिरीष कटेकर ,सरचिटणीस बादल ठाकूर,भारतीय जनता पार्टीच्या महिला जिल्हाध्यक्ष प्राजक्ता ताई बेणारे, मनसेचे तालुकाध्यक्ष शशिकांत पाटील, विधानसभा अध्यक्ष अनिल बागल, शहराध्यक्ष संतोष

कवडे, मनसे शहर संघटक गणेश पिंपळनेरकर ,मनसे उपजिल्हाध्यक्ष सिद्धेश्र्वर गरड, मनसे विद्यार्थी सेना तालुकाध्यक्ष प्रताप भोसले, शहराध्यक्ष अवधूत गडकरी, मनसे विभाग अध्यक्ष नागेश इंगोले, मनसे सहकार सेना जिल्हाध्यक्ष कृष्णा मासाळ, राष्ट्रवादीच्या महिला जिल्हाध्यक्ष वर्षाताई शिंदे, आरपीआय आठवले गटाचे नगरसेवक डी राज सर्वगोड, आदित्य जोशी, युवा सेना शहर प्रमुख सुमित शिंदे, विवेक बेणारे, महेश खिस्ते, राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष दिगंबर सुडके,संकेत ढवळे,अमोल पर्वतराव युवक शहराध्यक्ष,शुभम शिरकर विद्यार्थी परिषद शहराध्यक्ष ,रशीद शेख,

साधनाताई राऊत ओबीसी महिला अध्यक्ष, उपजिल्हाप्रमुख युवा सेना साईनाथ बडवे, शहर संघटक युवासेना सनी असंगे, शहर उपप्रमुख युवा सेना महबूब नदाफ, शहर उपप्रमुख युवा सेना आनंद शिंदे शहर उपप्रमुख युवासेना

गणेश चव्हाण,युवा सेना कॉलेज कक्ष तालुकाप्रमुख करण नागणे, युवा सेना तालुकाउपप्रमुख विश्र्वजीत नागटिळक,डॉ प्राजक्ता बेणारे, जिल्हाध्यक्ष भारतीय जनता पार्टी महिला मोर्चा सोलापूर ग्रामीणडॉ जोती शेटे, शहराध्यक्ष भारतीय जनतापार्टी महिला मोर्चा पंढरपूर शहरसौ अपर्णा तारके , उपाध्यक्ष

सौ सुजाता वगरे, उपाध्यक्ष जिल्हा कार्यकारणी भारतीय जनता पार्टी महिला मोर्चा सौ सुप्रिया काकडे, जिल्हा सरचिटणीस आणि सोशल मीडिया प्रमुख भारतीय जनता पार्टी महिला मोर्चासौ सरिता मुडे, सरचिटणीस जिल्हा कार्यकारणी महिला मोर्चा भारतीय जनता पार्टी अंजना जाधव, चिटणीस जिल्हा कार्यकारणी महिला मोर्चा सौ शिल्पा म्हमाणे, उपाध्यक्ष भारतीय जनता पार्टी महिला मोर्चा पंढरपूर शहर सौ मेघा मोळक, संघटन सरचिटणीस महिला मोर्चा पंढरपूर शहर भारतीय जनता पार्टी यांच्यासह महाराष्ट्र नवनिर्माण सेना, भारतीय जनता पार्टी, शिवसेना एकनाथराव शिंदे गट, राष्ट्रवादी अजित दादा पवार गट, आरपीआय आठवले गट, रासपा, लहुजी शक्ती सेना या विविध महायुतीच्या संघटनांचे पदाधिकारी इत्यादी उपस्थित होते.

# काँग्रेसकडे मुद्दे नसल्याने ते संविधानासंदर्भात दिशाभूल करण्याचे राजकारण करीत आहेत :आनंद चंदनशिवे

**वळसंग/प्रतिनिधी:**

मोदी सरकारच्या दहा वर्षाच्या या कार्यकाळात वंचित, शोषित, पीडित, शेतकरी,सर्वसामान्य नागरिक, महिला युवक यांना वैयक्तिक लाभ देण्याबरोबरच सोलापुराचा चेहरा मोहरा बदलण्याचा काम मोदी सरकारने केलेला आहे. त्यामुळे विरोधकांचे पायाखालची वाळू घसरली आहे म्हणून विकास कामावर बोलण्यासारखे त्यांच्याकडे मुद्देच नसल्यामुळे संविधान धोक्यात असल्याचे सांगत जनतेला भ्रमित करण्याचे काम काँग्रेस करीत असून त्यांच्या भुलथापांना जनता कधीच बळी पडणार नाही असे काम आमदार सचिन कल्याणशेट्टी व मोदी सरकारने केले असल्याचे प्रतिपादन राष्ट्रवादीचे सोलापूरचे नेते आनंद दादा चंदनशिवे यांनी व्यक्त केले भाजप महायुतीचे उमेदवार रामभाऊ सातपुते यांच्या प्रचारार्थ अक्कलकोट विधानसभा मतदारसंघातील विविध गावातील वळसंग,आचेगांव, तीर्थ,दिंडुर, वडगाव, रामपूर,लिंबीचिंचोळी, तोगराळी, गुद्रेहळी, हणमगाव, शिंगडगाव,औज, तिल्हेहाळ, आलेगांव आदी गाव भेट दौऱ्याप्रसंगी ते बोलत होते.



भाजप जिल्हाध्यक्ष आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या नेतृत्वाखाली प्रत्येक गावात आयोजित कॉर्नर बैठकीच्या माध्यमातून 'नमो संवाद दौऱ्यात त्यांच्या सोबत भाजप जिल्हा नेते रामाप्पा चिवडशेट्टी, महेश बिराजदार,जिप माजी पक्षनेते अण्णाराव बाराचारे,भाजपा अक्कलकोट तालुकाध्यक्ष मोतीराम राठोड, भाजप दक्षिण तालुकाध्यक्ष अंबिका पाटील,भाजप अनु जाती जिल्हा सरचिटणीस बलवान गोतसुर्वे, मलकाप्पा कोडले,अतुल गायकवाड अक्कलकोट विधानसभा प्रभारी राजकुमार झिंगाडे, अनिल बर्वे, रमेश क्षीरसागर, सौ. विश्रांती पाटील,महिबूब पटेल,सागर कोळी यासह त्या त्या गावातील भाजप महायुतीचे पदाधिकारी आजी माजी सरपंच व महत्त्वाचे कार्यकर्ते उपस्थित होते.

पुढे बोलताना चंदनशिव म्हणाले की मी या ग्रामीण भागात आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या सोबत प्रचार दौरा करत असताना आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी प्रत्येक गावात मुख्य रस्ते,जलजीवन मिशन अंतर्गत पाणीपुरवठा योजना त्याचबरोबर गावांतर्गत रस्ते गटारी, स्मशानभूमी व पायाभूत सुविधा करिता प्रत्येक गावात कोट्यावधीच्या पुढे निधी दिल्याने सर्व गावातून प्रचंड प्रतिसाद उमेदवार राम सातपुते यांना मिळत असून अक्कलकोट विधानसभा मतदारसंघातून ८० ते एक लाखापर्यंत मताधिक्य भाजप महायुतीला मिळणार यात काही एक शंका नाही.

या 'नमो संवाद' गावभेट दौरा प्रसंगी आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी 'अब कि बार ४०० पार' व :फिर एक बार मोदी सरकार' हा नारा दिला, विरोधकांच्या भूलथापांना बळी न पडता विकासाच्या मुद्द्यावर, गोरगरिबांच्या कल्याणाकरिता, आंतरराष्ट्रीय पातळीवर देशाची उंची आणखी बळकट करण्यासाठी, देशाला विकसित राष्ट्र बनवण्याकरिता आपण सर्वांनी देशाचे कणखर नेतृत्व नरेंद्र मोदी यांना तिसऱ्यांदा पंतप्रधान करण्याकरिता आपले उमेदवार रामभाऊ सातपुते यांना मोठ्या मताधिक्याने निवडून द्यावे असे आवाहन केले. या नमो संवाद दौऱ्या प्रत्येक गावात मोठ्या संख्येने महिला व युवक वर्गाने भाजपमध्ये प्रवेश केला.

# कल्याणशेट्टी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी घेतली मतदान जनजागृतीची शपथ

**अक्कलकोट/प्रतिनीधी :**

जात, धर्म, पंथ या पलीकडे जाऊन, नको जात पात, हवा आहे विकास, आयटी हब झालाच पाहिजे, अशी घोषणा देत कल्याणशेट्टी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी घेतली मतदान करण्याची शपथ..महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्था संचलित मातोश्री गुरुबसव्वा कल्याणशेट्टी महाविद्यालया तील विद्यार्थ्यांनी

**आम्ही मतदान करतो, तुम्ही आयटी हब आणा, आज आम्ही मतदान करण्याची शपथ घेतली आहे. माझ्या परिसरातील सर्वांना मतदान करण्यास आम्ही प्रवृत्त करू, परंतु संसदेत जाऊन अक्कलकोटचे प्रश्न कळकळीने मांडून येथे आयटी हब आणावा, त्यामुळे आमच्या हातात काम मिळेल अशी भावना उपस्थित विद्यार्थ्यांनी व्यक्त केली.**



लोकशाही बळकट करण्यासाठी तसेच केंद्रात बहुमताचे सरकार प्रस्थापित व्हावे म्हणून मतदान हे एक पवित्र कर्तव्य आहे, माझ्या एका मतामुळे केंद्रात मजबूत सरकार येणार आहे. म्हणून आम्ही मतदान करणार आहोत. नको जात पात- हवा आहे विकास असे म्हणत विद्यार्थ्यांनी मतदानाची शपथ घेतली. संस्थेचे जेष्ठ संचालक मल्लिनाथ कल्याणशेट्टी यांनी विद्यार्थ्यांना मतदान करण्यासाठी शपथ दिली. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ राजेंद्रसिंह लोखंडे, मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी, एनएसएस चे कार्यक्रमाधिकारी प्रा. राजशेखर पवार, डॉ शितल भस्मे, प्रा विद्याश्री वाले, प्रा विपुल जाधव, प्रा शितल फुटाणे, प्रा गुरुशांत हपाळे, डॉ बाळासाहेब पाटील उपस्थित होते. या उपक्रमाचे संस्थेचे अध्यक्ष आमदार सचिन कल्याणशेट्टी, संचालिका शांभवी कल्याणशेट्टी, विज्ञान विभाग प्रमुख पूनम कोकळगी, सौ रुपाली शहा मल्लिकार्जुन मसुती, यांनी कौतुक केले.

अक्कलकोट परिसरात औद्योगिकीकरणासाठी लागणाऱ्या पायाभूत सुविधा आहेत, कारखानदारी विकसित होण्यासाठी लागणाऱ्या मूलभूत सोई उपलब्ध आहेत, आता दळणवळणाची चांगली सोय आहे. त्यामुळे तंत्रज्ञानाच्या माध्यमातून येथे कारखाने उभारले पाहिजे. गुंतवणूकदारांनी आर्थिक गुंतवणूक केली पाहिजे. असे प्रतिपादन यावेळी मल्लिनाथ कल्याणशेट्टी यांनी केले.

# काझीकणबस मध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची १३२ जयंती मोठ्या आनंदाने जल्लोषात साजरा

**काझीकणबस/ यश सिद्धि न्यूज**

काझीकणबस मध्ये विश्र्वरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांची १३३ वी जयंती मोठ्या आनंदाच्या जल्लोषात संपन्न झाली. दिनांक २८ रात्री भीम गीतांचा भरदास जंगी कव्वालीचा कार्यक्रम संपन्न झाला व २९ रोजी सकाळी ठीक ०९.०० वाजता शालेय विद्यार्थ्यांचे विविध सांस्कृतिक कार्यक्रम संपन्न झाले. तर सायंकाळी ठीक ०६ वाजता भीम नगर मधून भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला अक्कलकोट नॉर्थ पोलीस स्टेशनचे ए.पी .आय. निलेश बागव यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून आणि बुद्ध वंदना घेऊन जयंती कार्यक्रमाच्या मिरवणुकीला सुरुवात करण्यात आली. सदरच्या कार्यक्रमाचे अध्यक्ष मेजर कमलाकर कांबळे हे होते. तर प्रमुख उपस्थिती म्हणून रत्नाकर गायकवाड, नरसिंह गायकवाड, वामन गायकवाड, शेकू गायकवाड ,खंडू गायकवाड, सुरज गायकवाड ,अर्जुन गायकवाड, धर्मा गायकवाड, सोपान गायकवाड ,हरीश गायकवाड ,मल्लू गायकवाड, मल्लिनाथ वाघमारे ,अमृत सोनकांबळे, राम हल्ले, शिवराज गायकवाड, मधुकर कांबळे, मधुकर गायकवाड ,विद्यासागर गायकवाड ,किरण गायकवाड, किसन कारवे, अभिमन्यू गायकवाड, अविनाश गायकवाड, गणेश गायकवाड, विशाल कांबळे, सचिन कांबळे ,भीम कांबळे ,लक्ष्मण लोखंडे ,निवृत्ती कांबळे, परमेश्र्वर गायकवाड, स्वप्निल गायकवाड , ज्ञानदेव लोखंडे, हरिबा



गायकवाड, तुकाराम गायकवाड, चंद्रकांत गायकवाड, रंजू गायकवाड, दत्ता कांबळेनारायण गायकवाड ,अमोल गायकवाड, गजानन गायकवाड ,दत्ता कांबळे, राजू गायकवाड ,चंद्रकांत गायकवाड ,दत्ता देढे , गंगाराम देडे सटवाजी उकरंडे, शत्रु करंडे, शरद जाधव, नगु हांडगे अफसर आगसापुरे,यांच्या प्रमुख उपस्थितीत मिरवणुकीला सुरुवात झाली. या महत्वपूर्ण जयंती कार्यक्रमाला गावचे सरपंच सिद्धाराम धर्मसाले उपसरपंच दत्तात्रय मुनाळे ,पोलीस पाटील दीपक मंडळे, माजी सरपंच अशपाकभाई आगसापुरे नारायण बंदीछोडे ,गणेश जाधव, कल्याणी मुनाळे ,संगमेश्र्वर मजगे, अभय वाले, सागर धर्मसाले. काशिनाथ खुबा .गावातील अनेक मान्यवर जेष्ठ नागरिक उपस्थित होते. या कार्यक्रमाला चोक बंदोबस्त ठेवून सहकार्य केलेले अक्कलकोट नोर्थ पोलीस स्टेशनचे ए पी आय बगव यांच्यासह वागदरी पोलीस स्टेशनचे हवालदार अंगद गीते, हवालदार विपिन सुरवसे, विजय महानोर या सर्वांनी अधिक परिश्रम घेतल्यामुळे अक्कलकोट नॉर्थ पोलीस अधिकारी आणि त्यांच्या स्टॉप चे जयंती कमिटीतर्फे जयंती कमिटी अध्यक्ष कमलाकर कांबळे यांच्या हस्ते शाल गुच्छ व निळा फेटा बांधून त्यांचा शानदार सत्कार करण्यात आला. आणि तदनंतर विशेष शिक्षणामध्ये शिक्षण घेत असलेल्या मुलांचा ए. पी .आय. बागवत यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. आणि त्यानंतर डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेची मिरवणूक प्रमुख मार्गाने निघून वाजत गाजत आणि शिस्तीने मार्गस्थ होत असताना आदर्श गावातील जनतेने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला अभिवादन करण्यासाठी रांगा लागल्या होत्या. तसेच काझी कणबस ग्रामपंचायत कमिटीने पुष्पहार अर्पण करून बाबासाहेबांना अभिवादन केले. तदनंतर बुद्ध वंदना कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# निफाड येथे १ मे महाराष्ट्र दिनानिमित्त शहरातून मतदान जनजागृती

**निफाड/प्रतिनिधी**

निफाड नगरपंचायत च्या वतीने एक मे महाराष्ट्र दिन व कामगार दिनानिमित्त निफाड नगरपंचायत च्या प्रांगणात नगरपंचायत चे नगरसेवक तथा बांधकाम विभाग सभापती किशोर ढेपले यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले असून निफाड शहरातून मतदान जनजागृती फेरी काढण्यात आली होती निफाड नगरपंचायत च्या वतीने महाराष्ट्र राज्य स्थापनेचा ६४ वा वर्धापन दिन.व कामगार दिनानिमित्त निवडणूक निर्णय अधिकारी व अतिरिक्त सहा. निवडणूक अधिकारी तथा तहसीलदार विशाल नाईकवाडे यांचे आदेशानुसार व उपविभागीय अधिकारी हेमांगी पाटील, नायब तहसीलदार खेडेकर, तसेच मुळीक ,यांचे प्रमुख उपस्थितीत निफाड शहरातून भव्य मतदान जनजागृती फेरी काढून घोषणा देऊन मतदान जागृती करण्यात आली,




यावेळी निफाड नगरपंचायत चे अधिकारी कर्मचारी तसेच नर्सिंग स्कूलचे, वैनतेय विद्यालयाचे विद्यार्थी आशा वर्कर ,अंगणवाडी सेविका, ग्रामस्थ यांनी फेरीत सहभाग नोंदविला होता, याप्रसंगी छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे मतदारांना शपथ देण्यात आली. याप्रसंगी निफाड नगरपंचायतच्या नगराध्यक्ष डॉ. कविता धारराव, उपनगराध्यक्ष अनिल पा. कुंदे, मुख्याधिकारी अमोल चौधरी, तसेच नगरसेविका कांताबाई कर्डिले, अरुंधती पवार, पल्लवी जंगम, शारदा कापसे ,रत्नमाला कापसे, अलका निकम, रूपाली रंधवे ,सुलोचना होळकर ,विमल जाधव, तसेच नगरसेवक किरण कापसे, साहेबराव बर्डे, सागर कुंदे, संदीप जेऊघाले, जावेद शेख, ललित गीते, बंटी भाऊ शिंदे, नंदकुमार कापसे, महेश जंगम, नगरपंचायतीचे अधिकारी गुलाब नवले, शरद बोडके ,शरद काकुळते, दिनेश सोनवणे, रतन खालकर, राजू भवर, उज्वला दिघे ,भाऊसाहेब मोगरे, रामदास कराटे, नंदू भोसले, बाबुराव थोरात आदी उपस्थित होते,

# प्रगतीशील लेखक संघाचे अध्यक्ष युवराज गंगाराम तर सचिव मुन्नाभाई नंदागवळी यांची निवड

**गोदिंया/यश सिध्दि न्यूज**

आंतरराष्ट्रीय स्तरावर कार्यरत असणाऱ्या सर्व राज्यपातळीवर आणि आता जिल्हा स्तरावर कार्य करणारी प्रगतीशील लेखक संघ जिल्हा गोदिंयाचे अध्यक्ष प्रा. युवराज गंगाराम तर सचिव मुन्नाभाई नंदागवळी यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. यावेळी महाराष्ट्र राज्याचे कार्यवाह प्रा. प्रसेनजित तेलंग यांच्या



नेतृत्वाखाली साहित्य क्षेत्रातील अनेक कवी, साहित्यिक व लेखकांना उत्तम संधी प्राप्त व्हावी म्हणून ही कार्यकारिणी तयार करण्यात आली. यावेळी या कार्यकारिणीचे अध्यक्ष म्हणून महाराष्ट्रातील नामवंत कवी व समीक्षक प्रा. युवराज गंगाराम, कवी उपाध्यक्ष बापू इलमकर, भगवान साखरे, कवी सचिव मुन्नाभाई नंदागवळी, सहसचिव चंद्रप्रकाश बनकर, संघटक कालीदास सूर्यवंशी, कोषाध्यक्ष दिनेश अंबादे, सदस्य म्हणून रवी चद्रिकापूरे नंदू वानखेडे के ए रंगारी यांची निवड करण्यात आली आहे.

याप्रसंगी निवड झालेल्यांची पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. यावेळी २५ साहित्य क्षेत्रात काम करणारे मंडळी उपस्थित होते.